# मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई,

प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, सेक्टर-१८, वाशी, नवी मुंबई-४००७०३

## दरपत्रक सुचना

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कर्मचारी संसाधन व्यवस्थापन (Human Resourse Management System) कर्मचारी स्वयंसेवा पोर्टल (ESS) व वेतन प्रक्रिया या सर्वांचा अंतर्भाव असलेली संगणक प्रणाली भाडेतत्वावर घेण्यासाठी ज्याच्याकडे अशा प्रकारच्या कामाचा पुरेसा अनुभव, संबंधित खाली नमूद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता करू शकतात अशा एजन्सी कडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१ GST/TAN नोंदणी असणे आवश्यक आहे.

२ कर्मचारी संसाधन व्यवस्थापन प्रणाली भाडेतत्वावर देण्याच्या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव, कंपनी/ एजन्सी खाजगी (Private) अथवा सार्वजनिक(Public) असल्याबाबतचा पुरावा, कंपनी/ एजन्सी भागीदारीत असल्यास संबंधित कागदपत्रे आवश्यक आहेत.

३ कर्मचारी संसाधन व्यवस्थापन (HRMS)तांत्रिक दृष्टया परिपुर्ण असल्याचे व इतर ठिकाणी त्याचा यशस्वी वापर होत असल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

४ मागील ३ वर्षाचे आयकर विवरण पत्र(ITR) व सीए दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे

५ इच्छुक कंपन्यांनी मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात प्र.उपसचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग दुसरा मजला, प्रशाकीय इमारत, सेक्टर-१८,वाशी,नवी मुंबई यांचेशी संपर्क साधून अथवा प्रत्यक्ष भेट घेऊन उपरोक्त कामासंदर्भात माहिती घेऊन प्रत्यक्ष पाहणी करून कामाचे स्वरूप समजुन घेणे बंधनकारक आहे.

६ इच्छुक दरपत्रकधारकांनी दरपत्रकासोबत तांत्रिक लखोटयामध्ये रू.२५०००/- इतक्या रक्कमेचा डीडी/ पे-ऑर्डर जोडणे आवश्यक आहे. तसेच दरपत्रकधारकांनी बाजार समितीकडे सादर करत असलेले कागदपत्र परिपूर्ण असून कोणतीही माहिती चुकीची/ खोटी नसल्याचा रू.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर अंडरटेकींग देणे आवश्यक आहे.

७ आर्थिक लखोटयामध्ये फक्त आर्थिक दरपत्रक सादर करावयाचे आहे.

८ तांत्रिक रित्या अपात्र असलेल्या एजन्सीचे आर्थिक लखोटा उघडण्यात येणार नाही.

९ उपरोक्त नमूद कागदपत्रांची साक्षांकीत छायाप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

१० मुद्या क्रमांक ५ मध्ये नमुद पत्त्यावर दरपत्रके सादर करण्याची अंतिम दिनांक १९/१२/२०२५ दु. ३.०० वाजेपर्यंत राहील.

११ मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, उपरोक्त कामासाठी आलेल्या कमीत कमी अथवा सर्व अथवा कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकरण्याचे हक्क राखून ठेवित आहे.

सही/-

सचिव

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई